02 MAR 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# अंध विद्यार्थ्यांनी स्पर्श ज्ञानातून अनुभवले शरीररचनाशास्त्र

## विज्ञान दिन : विद्यापीठासह विविध शैक्षणिक संस्थांमध्ये उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठासह विविध शैक्षणिक संस्थांमध्ये मंगळवारी विज्ञान दिन साजरा झाला. विद्यापीठात भरवलेल्या विशेष प्रदर्शनातून अंध विद्यार्थ्यांनी स्पर्श ज्ञानातून शरीररचनाशास्त्र अनुभवले.

विद्यापीठाचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र व यूजीसी स्कीम फॉर पर्सन विथ डिसॅबिलिटीज् यांच्यातर्फे जिल्हा परिषदेच्या विविध शाळांतील अंध विद्यार्थी व त्यांचे विशेष शिक्षक यांच्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनीही या प्रदर्शनाचे कौतुक केले.

प्रकल्प सहायक सतीश नवले, डॉ. धनंजय सुतार यांनी मनोगत व्यक्त केले. राजाराम महाविद्यालयाच्या मयूरी आवळे, पल्लवी राणे, अमृता किल्लेदार, प्रमोद कोराणे, ओंकार कांबळे, तुषार सुतार यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. भगवान लोखंडे यांनी आभार मानले. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात ग्रंथालयातील विज्ञानविषयक पुस्तके व संशोधन प्रबंधांचे प्रदर्शन मांडले.



शिवाजी विद्यापीठात अंध विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष प्रदर्शनामध्ये स्पर्श ज्ञानाद्वारे वैज्ञानिक उपकरणांची त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी माहिती दिली. यावेळी सतीश नवले उपस्थित होते.

### आनंदीबाई सरदेसाई हायस्कूल

आनंदीबाई सरदेसाई हायस्कूलमधील प्रदर्शनात विज्ञानावर आधारित उपकरणे मांडली होती. याचे उद्घाटन मुख्याध्यापक व्ही. एस. अतिवाडकर यांनी केले. बी. डी. भुसनर यांनी प्रास्ताविक केले. आरती कोपार्डेकर यांनी आभार मानले. प्रदर्शनाचे परीक्षण डी. आर. गुरव, व्ही. एस. पाटील, जे. एम. पोवार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 MAR 2023

लोकमत

# आंतरराष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी मृणाल कांबळेची निवड

**कोल्हापूर :** ढाका (बांगलादेश) येथे १६ ते १९ मार्चदरम्यान होणाऱ्या उत्तर आशियाई वरिष्ठ गट कुराश स्पर्धेसाठी कोल्हापूरच्या मृणाल नितीन कांबळे हिची भारतीय संघात निवड झाली.

मृणाल ही शिवाजी विद्यापीठात एमएस्सी (जैव रसायनशास्त्र) पहिल्या वर्षात शिकत आहे. तिला कुराश असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष डॉ. विशालकुमार धापटे, सचिव नितीन कांबळे, राज्य कुराश असोसिएशनचे अंकुश नगरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# विद्यापीठ वेबसाईटला भेट देताना सावधगिरी बाळगा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटला भेट देताना किंवा माहिती मिळवता दक्षता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. वेबसाईटचा पत्ता https:// www. unishivaji. ac. in असा आहे, पण याच नावाशी साधर्म्य असणाऱ्या काही बनावट, फेक साईट असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे साईटला भेट देऊ इच्छिणाऱ्यांनी एड्रेस बारमध्ये काळजीपूर्वक पत्ता टाकावा, अन्यथा माहिती चोरी, आर्थिक चोरी अशा प्रकारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2023
पुण्यनगरी

# मराठी भाषा गौरवदिनी झाला जागर अन् आदर

## शैक्षणिक संस्थांसह सामाजिक स्तरावर मराठी भाषेला मानाचा मुजरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लाभले आम्हास भाग्य जाणतो मराठी... जाहलो खरेच धन्य जाणतो मराठी... या ओळी आळवत मराठी भाषा गौरवदिनी सोमवारी शाळा, कॉलेज यासारख्या शैक्षणिक संस्थांसह सामाजिक स्तरावर व अनेक मराठी घरांमध्ये मराठी भाषेचा जागर आणि आदर करण्यात आला. शिवाजी विद्यापीठापासून ते प्राथमिक शाळांपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यानिमित्ताने सोशल मीडियावरही मराठी भाषेचा गौरव करणाऱ्या संदेशांची देवाणघेवाण सुरू होती. मराठी भाषेला अजूनही राजभाषेचा दर्जा न मिळाल्याने मराठी भाषेच्या अभ्यासकांसह मराठीप्रेमींनी खंत व्यक्त केली.


ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस म्हणजे २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने मराठी भाषाविषयक उपक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेचा गौरव करण्यात आला. पोरे शिशुविहारमध्ये लहान मुलांसाठी अक्षरावरून शब्द बनवण्याची स्पर्धा रंगली.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग तसेच डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सकाळी विद्यापीठ परिसरामध्ये 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात मोठ्या उत्साहात ग्रंथ दिंडी काढली. त्यांना हुपरीच्या अनुभवी वारकऱ्यांची साथसंगत लाभली. दिंडीतील पालखीमध्ये श्री ज्ञानेश्वरीसह तुकारामबोवांची गाथा, नामदेवांची गाथा यासह भारतीय संविधान ठेवले होते. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पालखीचे पूजन झाले. त्यानंतर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुढे दिंडीचे वि. स. खांडेकर भाषा भवन येथे आल्यानंतर विसर्जन करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात अरुण कोल्हटकर लिखित 'भिजकी वही' या कविता संग्रहाचे नाट्यात्म सादरीकरण जळगाव येथील परिवर्तन चमूतर्फे करण्यात आले. यामध्ये शंभू पाटील, सोनाली पाटील, हर्षदा कोलटकर, राहुल निंबाळकर, हर्षल पाटील, मंगेश कुलकर्णी, जयश्री पाटील, सुदिप्ता सरकार, मंजूषा भिडे, अंजली पाटील, सुनीला भोलाने आदी कलाकारांचा समावेश होता. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# विद्यापीठ प्राध्यापक पतसंस्थेच्या संचालकपदी साळुंखे



मुरगूड : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे मानसशास्त्राचे प्रा. दीपक साळुंखे यांची कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यात कार्यक्षेत्र असलेल्या शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक सहकारी पतसंस्था (सुटा) या संस्थेवर २०२३-२०२९ या कालावधीसाठी संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडी कामी खासदार संजय मंडलिक याचे आशीर्वाद व वीरेंद्र मंडलिक यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात विज्ञान दिन प्रदर्शन

कोल्हापूर : मानवी शरीराची अंतर्गत रचना कशी असते, हे आज आम्हाला प्रथमच स्पर्शज्ञानाच्या माध्यमातून अनुभवता आले. हा अनुभव अत्यंत रोमांचक ठरला,' अशी प्रतिक्रिया शहरातील विविध शाळांतील दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांनी येथे व्यक्त केली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाने जागतिक विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या विशेष विज्ञान प्रदर्शनाचे.

शिवाजी विद्यापीठाचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र व यूजीसी स्कीम फॉर पर्सन विथ डिसॅबिलिटीज यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी जागतिक विज्ञान दिनाच्या निमित्ताने शहरातील जिल्हा परिषदेच्या विविध शाळांतील दृष्टी-दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे विशेष शिक्षक यांच्यासाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रातील व्हर्च्युअल क्लासरूममध्ये करण्यात आले. अंध विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध प्रयोग समजावेत, शरीररचनाशास्त्र त्यांनी समजून घ्यावे, जेणे करून विज्ञानातील संकल्पना त्यांना सुलभपणे समजतील, या हेतूने प्रदर्शनामध्ये अनेकविध त्रिमितीय मॉडेल्स मांडण्यात आली.

पुण्यनगरी

# मृणाल कांबळे हिची निवड



मृणाल कांबळे

**कोल्हापूर :** कसबा बावडा येथील मृणाल नितीन कांबळे हिची बांगलादेश येथे होणाऱ्या साऊथ एशियन चॅम्पियनशिप कुराश स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १६ ते १९ मार्चअखेर ही स्पर्धा होणार आहे. मृणाल कांबळे ही शिवाजी विद्यापीठाची खेळाडू आहे. तिला कुराश असोसिएशन जिल्हाध्यक्ष डॉ. विशालकुमार धापटे, सचिव नितीन कांबळे, राज्य कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नगरकर, राज्य सचिव संजय धोपीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 MAR 2023
सकाळ


## प्रफुल्ल शिलेदार; शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातर्फे चर्चासत्र

# जयंत पवार भूमिका घेऊन जगणारे लेखक

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : 'जयंत पवार हे भूमिका घेऊन जगणारे लेखक होते. त्यांचे नाट्यलेखन, नाट्यसमीक्षा जिवंत रंगभूमीचा इतिहास आहे', असे प्रतिपादन कवी प्रफुल्ल शिलेदार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे आयोजित 'जयंत पवार यांचे साहित्य' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. शिलेदार म्हणाले,





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे आयोजित चर्चासत्राच्या उदघाटनप्रसंगी बोलताना कवी प्रफुल्ल शिलेदार.

'नव्वदनंतरच्या मराठी साहित्याचा चेहरा पवार होते. त्यांच्या साहित्यात अधिभौतिक प्रश्नांची सखोल जाण आहे. आजूबाजूच्या घटनांचे सखोल चिंतन त्यांच्या साहित्यातून दिसून येते. ऐंशीनंतरच्या काळाला एक चेहरा देण्याचा प्रयत्न त्यांच्या लेखणीने केला.'

समीक्षक प्रा. नितीन रिंढे म्हणाले, 'भारतीय कथनपरंपरा पचवलेला लेखक म्हणून जयंत पवार यांचा उल्लेख करावा लागेल. ते आपल्या लेखनातून वास्तव उभे करतात. त्यामुळे त्यांची कथा काळाचा उभा छेद घेताना दिसते. कल्पिताचा अपूर्व वापर त्यांच्या साहित्यात दिसून येतो.' कवी किशोर कदम यांनी पवार यांच्या आठवणी जाग्या केल्या.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'जयंत पवार यांचे साहित्य हे सर्वसामान्य माणसांचे जगणे केंद्रवर्ती असलेले साहित्य आहे.' नाट्याभ्यासक राजीव नाईक म्हणाले, 'पवार यांच्या नाटकातील विविध प्रकारच्या तणावबिंदूंनी नाटक आकाराला आले. यात त्यांचे श्रेष्ठत्व सामावले आहे.' मराठी विभागप्रमुख प्रा. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रणधीर शिंदे यांनी आभार मानले.

### अभ्यासकांची मांडणी अशी...

▪ या चर्चासत्रात जयंत पवार यांचे नाट्यलेखन, कथालेखन, संकीर्ण साहित्य या विषयावर मांडणी झाली. त्यामध्ये प्रा. गोविंद काजरेकर, प्रभाकर देसाई, किरण गुरव, डॉ. संदीप दळवी, माया पंडित-नारकर, प्रवीण बांदेकर, संपत देसाई, प्रमोद मुनघाटे या अभ्यासकांनी मांडणी केली. समारोपाला साहित्यिक राजन गवस यांनी जयंत पवार यांच्या साहित्याचे वेगळेपण सांगितले.

तरूण भारत

# प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांची 'विद्या परिषदेवर' निवड



कोल्हापूर : येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांची शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेवर महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व विद्यापीठ कुलपती यांचे नामनिर्देशित प्रतिनिधी म्हणून निवड झाली. प्राचार्य पाटील यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

तरुण भारत

# 'एशियन कुराश'साठी मृणालची निवड

**कोल्हापूर :** बांगला देश ढाका येथे १६ ते १९ मार्च दरम्यान सिनीयर साऊथ एशियन चॅम्पीयनशिप स्पर्धा होत आहे. या स्पर्धेसाठी कसबा बावडा येथील मृणाल नितीन कांबळे हिची निवड झाली आहे. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय निवड चाचणीमध्ये तिने चमकदार कामगिरी केल्याने तिची निवड झाली. मृणाल ही शिवाजी विद्यापीठाची खेळाडू असून ती एमएससीच्या पहिल्या वर्षांत (बायोकेमीस्ट्री) शिकत आहे. तिला जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धापटे, सचिव नितीन कांबळे, राज्य कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नगरकर, राज्य सचिव संजय धोपीरकर यांचे मार्गदर्शन लाभले.